एम एम आर डी ए
MMRDA

क्रमांक : प्र/आस्था (४)/४५२४/२६-२७ दिनांक :

प्रति,

**विषय :** प्राधिकरणाच्या नवीन व जून्या इमारतीमधील विस्तारीत दूरध्वनी आणि थेट दूरध्वनींचे दुरूस्ती व देखभालीचे तसेच कराव्या लागण-या वायरिंगसाठी वार्षिक कंत्राट करणेबाबत.

महोदय,

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण कार्यालयाच्या नवीन व जून्या इमारतीमधील विस्तारीत दूरध्वनी आणि थेट दूरध्वनीं यंत्राचे दुरूस्ती व देखभालीचे वार्षिक कंत्राट करणेबाबत निविदा/दरपत्रक मागविण्यात येत आहे. पुरवठादाराने दरपत्रक बंद लिफाफ्यातून खालील पत्यावर कार्यालयीन वेळेत **दि. ३ ऑगस्ट, २०२६ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत** किंवा त्यापूर्वी सादर करावे. अंतिम दिनांका नंतर प्राप्त दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही.

२. प्राधिकरणातील नवीन इमारतीमधील विस्तारीत दूरध्वनी आणि थेट दूरध्वनींचे दुरूस्ती व देखभालीचे तसेच कराव्या लागणाऱ्या वायरिंगसाठी संबंधीची माहिती खालील तक्त्यात नमुद करण्यात आली आहे :-

| अनु.क्र. | तपशिल | रक्कम (रू.) |
|---|---|---|
| १ | प्राधिकरणाच्या नवीन व जून्या इमारतीमधील विस्तारीत दुरध्वनी, थेट दूरध्वनी, पीए टू बॉस दूरध्वनी यंत्रांची किरकोळ दूरूस्ती, साफसफाई, दूरध्वनी वायरिंग अथवा अन्य तांत्रिक दोष, तक्रार (किरकोळ तुटलेल्या वायर जोडणे, पुनर्जोडणी (fitting), दूरध्वनी संच एकाच विभागात स्थानांतर करणे, रोजेक्ट बॉक्स, दूरध्वनी दुरूस्ती,आवाजातील अडथळे, दूरध्वनी क्रमांक समांतर जोडणी इ. कामे समाविष्ट राहतील. (कालावधी प्रथम वर्षाकरिता.) | |
| | + GST १८% | |
| | एकूण रक्कम | |
| २ | द्वितीय व तृतीय वर्षाकरिता एकूण रक्कमेवर ७.५ % वाढ देण्यात येईल. | |
| ३ | दूरध्वनी यंत्रेसामुग्री व किरकोळ वायरिंग करिता जास्त सुटे भाग लागल्यास बाजार भावानुसार ( Market Rate) खर्च अदा केला जाईल. | |

(कृ.मा.पहा)

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण
वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०००५१.
दू +९१ २२ २६५९ १२३४ ईपीएबीएक्स +९१ २२ २६५९ ०००१ / ४००० फॅ +९१ २२ २६५९ ११९२ / १२६४
https://mmrda.maharashtra.gov.in

३. प्राधिकरणाच्या नवीन व जून्या इमारतीमधील विस्तारीत दूरध्वनी आणि थेट दूरध्वनींचे दुरूस्ती व देखभालीचे तसेच कराव्या लागणा-या वायरिंगसाठी वार्षिक कंत्राटाच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे असतील:-

(१) सदर सर्वंकष देखभाल व दुरूस्ती कंत्राटाचा कालावधी पुढील ३ वर्षांकरीता राहिल.

(२) दरपत्रक कागदपत्रात कोठेही खाडाखोड, Owerwriting पांढरी शाई व त्यावर पुन्हा लिखाण करणे टाळावे.

(३) सदर कंत्राटामध्ये प्रत्येकी तीन महिन्यास देय असलेला देखभाल व दुरूस्तीबाबतचा सेवा अहवाल (Service Report) सादर केल्यानंतर देय असलेली रक्कम प्रत्येकी सहा महिन्यांनी अदा करण्यात येईल.

(४) देखभाल व दुरूस्तीकरीता ज्यावेळी दूरध्वनी, वायरींग, अथवा अन्य तांत्रिक दोषांसाठी आवश्यकता भासल्यास तातडीच्या प्रसंगी सूचना मिळताच अल्प कालावधीत मेकॅनिक / टेक्नीशियन यांची सेवा उपलब्ध करणे आपणांवर बंधनकारक राहिल.

(५) तसेच कार्यालयातील दूरध्वनी यंत्र किंवा वायरींग ना-दुरूस्त असल्याबाबत कळविल्यानंतर कार्यालयात येणा-या मेकॅनिकला / टेक्नीशियनला कोणताही खर्च अदा केला जाणार नाही.

(६) वापरात येणारे वायर, केबल, रोजेट बॉक्स व दूरध्वनी यंत्रांचे सुटे भाग इत्यादींचा दर्जा उत्कृष्ट प्रकारचा असणे आवश्यक राहिल.

(७) दर नमुद करताना मुळ किंमत व त्यावरील GST अशी स्वतंत्र किंमत नमुद करुन सादर करावेत.

(८) हे प्राधिकरण कोणत्याही कारणा शिवाय कोणतीही निविदा/दरपत्रक फेटाळण्याचे हक्क राखुन ठेवीत आहे.

२४/७/२०२६

**( महेश मथुरे )**
सचिव,
कार्यकारी समिती (अति.कार्य.)